जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ९९ दिनांक - ०९/०२/२०२४**

हडपसर पोलिस स्टेशन पुणे शहर

## अमन संजय दिवेकर (टोळी प्रमुख) व त्याचे ०२ साथीदार यांचेविरुध्द मकोका अंतर्गत कारवाई

यातील तक्रारदार हे दिनांक ०६/१२/२०२३ रोजी १६/४५ वाजण्याचे सुमारास ख्वाजा गरीब नवाज मश्जिद जवळ,म्हाडा सोसायटी,हडपसर,पुणे येथुन त्यांचे मोटर सायकलवरुन जात असताना,तीन अनोळखी इसमांनी संगनमत करुन एकाने फिर्यादीचे मोटर सायकलचा हॅन्डल पकडून गाडी बंद करणेस सांगुन, त्यानंतर दुस-याने फिर्यादीचे गळ्याला धारधार लोंखडी हत्यार लावले व तिस-या इसमाने फिर्यादीचे पॅन्टचे पाठीमागील खिशातुन ४,०००/- रु जबरदस्तीने काढुन घेतले व पैसे काढणारे इसमाने जर कोणाला सांगीतले तर खलास करुन टाकीन अशी धमकी दिली म्हणून फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून **हडपसर पोलीस स्टेशन गु.र.नं.१८९१/२०२३,भादंवि कलम ३९२,३४,महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)सह १३५, भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५)** प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

दाखल गुन्हयाचा तपास हडपसर पो.स्टे.व गुन्हे शाखा युनिट ५ पुणे शहर हे करीत असताना गुन्हे शाखा युनिट ५ पुणे शहर कडील पोलीस अंमलदार यांनी त्यांचे बातमीरादारामार्फत मिळालेल्या बातमीवरुन सापळा लावुन पोलीस अभिलेखावरील आरोपी **१)अमन संजय दिवेकर,वय-२४ वर्ष,रा.जैननगर, बिबवेवाडी,पुणे,मुळगांव-दौंड,जि.पुणे (टोळी प्रमुख) २)विशाल संजय लोखंडे,वय-२४ वर्ष,रा.इंदीरानगर, अप्पर डेपो,बिबवेवाडी,मुळगांव-उस्मानाबाद (टोळी सदस्य) यांना दाखल गुन्हयात अटक करण्यात आली असुन ३)विधीसंघर्षीत बालक (टोळी सदस्य) यास ताब्यात घेण्यात आले आहे.**

नमुद आरोपी **अमन संजय दिवेकर (टोळी प्रमुख)** याने संघटित गुन्हेगारी टोळी तयार केली असुन त्यानी बेकायदेशिर मार्गाने बिबवेवाडी,काळे-पडळ,म्हाडा कॉलनी हडपसर,सय्यदनगर, या भागात त्यांचे टोळीचे वर्चस्व वाढविण्यासाठी बेकायदेशिरपणे घातक शस्त्र बाळगुन जबर दुखापत करणे, विनयभंग करणे, गाडयांची तोड-फोड करुन नागरीकांमध्ये दहशत निर्माण करणे, अशा प्रकारे स्वतःस व टोळीचे सदस्यास अवैध मार्गाने आर्थिक लाभ व इतर फायदा व्हावा या उददेशाने गंभीर स्वरूपाचे गुन्हे वारंवार संघटितपणे करीत आहेत.त्याचेवर प्रतिबंधात्मक कारवाई करुन सुध्दा त्यांनी पुन्हा पुन्हा गंभीर स्वरुपाचे गुन्हे केलेले आहेत.

दाखल गुन्हयात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii), ३(२),३(४) चा अंतर्भाव करणेकामी हडपसर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.रविंद शेळके यांनी मा.पोलीस उप-आयुक्त.परीमंडळ-५ पुणे शहर,श्री.आर.राजा यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री.रंजनकुमार शर्मा यांना प्रस्ताव सादर केलेला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन हडपसर पोलीस स्टेशन गु.र.नं.१८९१/२०२३, भादंवि कलम ३९२,३४, महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१) सह १३५, भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५) अन्वये दाखल असलेल्या गुन्हयामध्ये महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२), ३(४) चा अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा यांनी मान्यता दिलेली आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,हडपसर विभाग पुणे शहर,श्रीमती.अश्वीनी राख हया करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.अमितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त, श्री. प्रविण पवार, मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त,परीमंडळ-५ पुणे शहर,श्री.आर.राजा, मा.सहा.पोलीस आयुक्त,हडपसर विभाग पुणे शहर, श्रीमती अश्विनी राख, त्यांचे मार्गर्शनाखाली मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक हडपसर पोलीस स्टेशन पुणे शहर,श्री.रविंद शेळके, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.विश्वास डगळे, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.संदिप शिवले, सहा.पोलीस निरीक्षक,श्रीमती.सारिका जगताप, सहा.पोलीस निरीक्षक,दोरकर, निगराणी पथकातील पोलीस अंमलदार, प्रविण शिंदे, महेश उबाळे, वसीम सय्यद, गिरीश एकोर्गे, बाबा शिंदे, रामेश्वर नवले यांनी कारवाई केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.अमितेश कुमार यांनी पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार स्विकारल्या नंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देवुन शरीराविरुद्ध व मालमत्तेविरूध्द गुन्हे करणारे व समाजामध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवुन, गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देणेबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश दिलेले आहेत. **२०२४ या चालु वर्षातील मकोका अंतर्गत केलेली ही १२ वी कारवाई आहे.**